# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पेक्स, गडचिरोली ४४२६०५
फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४
Email-development.section@unigug.ac.in
Web: unigug.ac.in


**जा.क्र./गोंवि /मविविवि./** 1004 **/२०२५** **दिनांक :** 28 **/ ७ /२०२५**

## परिपत्रक

**विषय :- अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. संस्था अध्यक्ष/ सचिव/ प्राचार्य यांना कळविण्यात येते की, दि. ८/१०/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित सर्व पात्र महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करणे अनिवार्य असून, त्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. परंतु (उच्च व तंत्र शिक्षण विभाग ) महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.२१.०५.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नॅक बंगलोर यांचे उच्च शिक्षण संस्थांसाठीचे नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकनासाठी संस्था नोंदणी पोर्टल कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले असता, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) महाराष्ट्र शासन यांनी विद्यार्थी हितास्तव नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन करणेकरीता महाविद्यालयांना मुदतवाढ देणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

महाविद्यालयांमधील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत या विद्यार्थी हितास्तव नॅक बंगलोर या संस्थेकडून नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन करणेकरीता ६ महिने पर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५(८१) अन्वये शिथिलता देण्यात येत आहे.

तसेच नॅक बंगलोर यांचेकडून नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन करण्यासाठीचे उच्च शिक्षण संस्था नोंदणी पोर्टल कार्यान्वित होताच १ महिण्याच्या आत संबंधित महाविद्यालयांनी नॅक बाबतची कार्यवाही पुर्ण करावी तसेच नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकनाबाबतची प्रक्रिया त्वरेने करुन तसेच निर्गमित शासन निर्देशानुसार विद्यापीटास संबंधीत महाविद्यालयांनी मुदत वाढकरीता महाविद्यालय व विद्यपीठ विकास विभागात अर्ज सादर करावा. करीता संबंधितांनी नोंद द्यावी.

**मा. प्र-कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने,**

(श्री. दिनेश नरोटे)
सहाय्यक कुलसचिव
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रति,**

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१) मा. कुलगुरू महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली